## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) अन्वये झालेले व्दितीय अपिल

### अपिल क्रमांक : के.आर- ३०९१/२०२१

अपिलार्थी, श्री.प्रकाश मोहनदास केसवानी
बैरक नं.१९१७, रूम नं.२०,
शनि मंदिरच्या मागे, ओ.टी.सेक्शन
उल्हासनगनर, जि.ठाणे ४२१ ००५.

विरुध्द

जन माहिती अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग
उल्हासनगर महानगरपालिका,
मुख्य प्रशासकीय इमारत, चोपडा कोर्ट रोड,
उल्हासनगर, जि.ठाणे ४२१ १०३

प्रथम अपीलीय प्राधिकारी, सामान्य प्रशासन विभाग
उल्हासनगर महानगरपालिका,
मुख्य प्रशासकीय इमारत, चोपडा कोर्ट रोड,
उल्हासनगर, जि.ठाणे ४२१ १०३

द्वितीय अपिल अर्ज सुनावणीचा दिनांक : ०८.०४.२०२४

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज दाखल दिनांक | प्रथम अपिल आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| १३.०९.२०२१ | -- | २२.१०.२०२१ | -- |

अपिलार्थी यांनी दि. ०६.१२.२०२१ रोजीच्या अर्जान्वये *" माहिती मिळाली नाही. प्रथम अपिल आदेश मिळाले नाहीत. "*असे कारण नमूद करुन कलम १९(३) अन्वये व्दितीय अपिल अर्ज दाखल केला आहे. सदर द्वितीय अपिलावर आज दिनांक ०८.०४.२०२४ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थी उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय प्राधिकारी तसेच जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत (कार्यालयाद्वारे नोटीस प्राप्त झालेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत).

अपिलार्थी यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्राणे माहिती मागितली आहे.

*" उल्हासनगर महानगरपालिका कर्मचारी गणेश अरविंद शिंपी यांचे विरुध्द अॅन्टी करप्शन ठाणे विभागात केलेल्या तक्रारी अर्जावरील उ.म.पा.आयुक्त यांचे कार्यालयात सादर केलेल्या १) जा.क्र.१९२२ दि.०४.०६.२०१६, २) जा.क्र.३७४४ दि.२०.१०.२०१८, ३) जा.क्र.२९३२ दि.१९.०७.२०१७ या रोजीच्या पत्रावरील आयुक्त महोदयांनी केलेली कार्यवाही, चौकशी व अहवालांची माहिती सोबत मुळ कागदपत्रांची लेखी माहिती द्यावी. अँटी करप्शन द्वारे दिलेल्या पत्रांची छायांकित प्रती सोबत जोडली आहे."*

तद्नंतर अपिलार्थी यांनी जोडपत्र ब मध्ये *" माहिती प्राप्त झालेली नाही "*असे कारण नमूद करुन प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये प्रथम अपिल दाखल केले.

जन माहिती अधिकारी अनुपस्थित असल्यामुळे द्वितीय अपिलावर, गुणवत्तेवर निर्णय देण्यात येत आहे.

सदर प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये मागीलेली माहिती न मिळाल्यामुळे, प्रथम अपिल दाखल केले आहे. प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी सुनावणी घेऊन, आदेश पारित केले नाहीत. यास्तव त्यांनी द्वितीय अपिल दाखल केले आहे.

आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय प्राधिकारी हे सुनावणीची नोटीस प्राप्त होऊन देखील अनुपस्थित आहेत. त्यांना पुन्हा एक संधी देण्यात येऊन, सदर सुनावणी पुन्हा घेण्यात येईल. पुढील सुनावणीस

अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय प्राधिकारी यांची उपस्थिती अनिवार्य राहिल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

<u>आदेश</u>

सदर प्रकरणी पुढील सुनावणी दि.१०.०६.२०२४ रोजी दुपारी १२.०० वाजता घेण्यात येईल.

(शेखर चन्ने)
राज्य माहिती आयुक्त,
कोंकण खंडपीठ

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : ०८ एप्रिल, २०२४ .

संगणक-11